प्रकरण - तिसरे

डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे भाषावार प्रांतरचनेविषयीचे विचार

प्रकरण तिसरे

डॉ. बाबासाहेब आंबेडकराची भाषावार प्रांतरचनेविषयी विचार

प्रस्तावना :

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय संघराज्याची वांधणी कशी करावी हा एक मोठा प्रश्न होता. स्वातंत्र्यानंतर अस्तित्वात आलेली अ, व, क, ड ही राज्यरचना केवळ तात्पुरती होती. संघराज्याची वांधणी ही विशिष्ट तत्वाच्या आधारे होणे गरजेचे होते. भाषावार प्रांतरचना करावी हे काँग्रेसचे स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील धोरण काहीसे मागे पडले. भाषावार प्रांतरचना केल्यामुळे भारताच्या अखंडत्वाला धोका निर्माण होईल असे नेहरूंसारख्या नेतृत्वाला वाटू लागले. परंतु भाषिक समूहांनी भाषावार प्रांतरचना करण्यासाठी तीव्र आंदोलन सुरू केले. अनेक राजकीय विचारवंत व नेते भाषावार प्रांतरचनेचे पुरस्कर्ते होते तर काहीजण त्याच्या विरोधात होते. भारतीय संघराज्याचा साकल्याने विचार करणा-या डॉ. वावासाहेव आंवेडकरांनो भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न विचारपूर्वक सोडवला पाहिजे अशी भुमीका घेऊन भाषावार प्रांतरचनेवद्दल विवेकपुर्ण व चिकित्सक विचार मांडले. त्यांच्या विचारांचा या प्रकरणात आढावा घेतला आहे.

भाषिकवादाच्या मर्यादा :

डॉ. आंवेडकरांच्या मते, भाषेच्या आधारावर राज्याची निर्मिती करताना, एक राज्य, एक भाषा हया तत्वाचा स्विकार करावा ते म्हणतात, " जर्मनी, फ्रान्स, इटली या देशाच्या राज्यघटना तपासून पहा. एवढेच नव्हे तर इंग्लड, अमेरिका सारख्या प्रभावी देशाच्या राज्यघटनांचे अवलोकन करा. या सर्व राज्यघटनांमध्ये एकच तत्व आपणास पाहावयास मिळेल. ते हे की एका राष्ट्राच्या निर्मिती करीता एकच भाषा अवलंवलेली आहे."[१] यावरून एकराज्य एकभाषा हे तत्व जगमान्य आहे. असे आंबेडकर स्पष्ट करतात परंतु त्याचबरोबर भाषिकवादाच्या काही मर्यादाही ते स्पष्ट करतात.

अ. भाषा हे दुधारी अस्त्र :

एकभाषिक राज्य अस्थिर असते याचे कारण सांगताना डॉ. आंबेडकर म्हणतात, "राज्याची स्थापना, एक दुस-याच्या सहानुभूतीच्या भावनेवर अधिष्ठित असते. या भावनेने आपण भावनिक, वैचारिक दृष्टया एकत्र येतो व एक दुस-याला जणु रक्तमांसाच्या आप्तेष्टासारखेच समजु लागतो ही तलवारीसारखी दुधारी भावना आहे."[२] डॉ आंबेडकरांच्या मते, समभाषिकांबद्दल आपुलकी, तर अन्य भाषिकांबद्दल दुरावा, असे सहानुभूतीच्या भावनेचे दुधारी स्वरूप असते. त्यामुळे एकभाषिक राज्याची आवश्यकता आहे. परंतु सहानुभूतीची भावना ही भाषिकवादाची मर्यादा होऊन बसते.

लोकशाही राज्य निर्माण करण्यासाठी डॉ. आंबेडकर म्हणतात"लोकशाही म्हटली की, विरोध होणारच, कलह माजणारच. परंतु आपण एक दुस-याबद्दल सहानुभुतीची भावना सातत्याने जागृत ठेवली तरच लोकशाही टिकु शकेल."[३] यावरून लोकशाही टिकुन ठेवण्यासाठी सहानुभूतीची भावना आवश्यक आहे आणि ही भावना एक भाषिक समाजात निर्माण होते. परंतु बहुभाषिक राज्यात प्रामुख्याने नेतृत्वासाठी गटबाजी आणि राज्यकारभारासाठी भेदनीती या गोष्टी आढळतात. त्यामुळे लोकशाही टिकुन रहात नाही. "एक राज्य, एक भाषा हया तत्वानुसार राज्ये रचना झाली तर जातीय वैमनस्य व सांस्कृतीक संघर्ष या सारखे राष्ट्रीय एकात्मतेला तडा देणारे वाद निर्माण होणार नाहीत."[४] यावरून एका राज्याची एक भाषा असणे आवश्यक आहे त्यामुळे संघर्ष कमी होईल, असे डॉ. आंबेडकरांना वाटते. "कॅनडा, स्विझर्लंड आणि दक्षिण आफ्रिका या देशांनी बहुभाषिक राज्याची स्थापना केलेली आहे. यात तिळमात्र शंका नाही परंतु तिन्ही देशाची आणि भारताची बौध्दीक पातळी यात फारच तफावत आहे, ही गोष्ट आपण नाकारू शकणार नाही. भारतीयातील बौध्दीक वर्गाचा जो कल आहे तो भेदनीती विशेष आहे, तर स्विझर्लंड, दक्षिण आफ्रिका व कॅनडातील वर्गाचा कल परस्परातील प्रेमाचे दुवे साधण्याचा आहे, त्यामुळे बहुभाषिक राज्य स्थापन झाले आहे. म्हणुनच भाषावार राज्य निर्मितीचा मार्गच भारताला प्रगतीची वाट दाखवु शकतो"[५] असे मत डॉ. आंबेडकरांनी मांडले.

ब. भाषिक राज्यातुन उपराष्ट्रवादाचा उदय

एखादया गोष्टीचा फायदा होताना त्याचे काही तोटे किंवा वाईट परिणामही होत असतात. भाषावार प्रांतरचनेमुळे निर्माण झालेल्या घटक राज्ये, "प्रादेशिक भाषेचा उपयोग राज्यात सरकार चालविण्याकरिता करतील व साहजिकच त्या भाषेमुळे त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना रूजु लागेल, स्वतंत्र राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा उद्भव झाला की विलग राज्य ही कल्पना उदयास येईल,"[६] असा स्पष्ट इशारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला होता. यावरून प्रादेशिक भाषेच्या वापरामुळे उपराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होईल व ती भारताच्या अखंडतेला, एकात्मतेला बाधक ठरेल असे डॉ. आंबेडकर म्हणतात. ते म्हणतात, "भाषावार प्रांतरचना केली अथवा न केली तरी धोका आहेच. त्याकरिता हा धोका टाळण्यासाठी प्रादेशिक भाषा ही राज्याची संपर्क भाषा मुळीच होऊ नये अशी आपल्या घटनेत तरतुद करावी"[७] एवढेच सांगुन ते थांबत नाहीत तर ते "राष्ट्रभाषा एकच हिंदी असावी आणि जेव्हा पर्यंत या कार्यात भारत परिपुर्ण होणार नाही तेव्हापर्यंत इंग्रजी चालुच ठेवावी."[८] असेही सांगतात. यावरून भाषावार प्रांतरचना करावी पण प्रादेशिक भाषा संपर्क भाषा असु नये, त्यासाठी पर्याय म्हणुन एक राष्ट्रभाषा हिंदी असावी असेही डॉ. आंबेडकरांनी सुचविले आहे. पुढे जाऊन डॉ. आंबेडकर असेही म्हणतात की, "ज्या भारतीयांना भाषावार राज्य रचना करताना माझी ही सूचना अमान्य होत असेल, त्याला भारतीय म्हणवुन घेण्याचा काहीच नैतिक अधिकार नाही. तो स्वत: १00 टक्के महाराष्ट्रीय, तामीळ किंवा गुजराथी असेल पण ख-या अर्थाने तो भारतीय बनुच शकत नाही."[९] यावरून भाषावार प्रांतरचना केली, तरी तेथे प्रादेशिक भाषा ही संपर्क भाषा न होता हिंदी ही संपर्क भाषा होणे किती गरजेचे आहे हे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले आहे.

भाषावार प्रांतरचनेची गरज डॉ. आंबेडकरांची भूमिका

भाषावार प्रांतरचनेच्या संकल्पनेस डॉ. आंबेडकर पाठिंबा देतात व म्हणतात "भिन्न भाषेच्या व भिन्न संस्कृतीच्या लोकांना आपापल्या भाषेचा नि संस्कृतीचा परिपोष करण्यासाठी संधी मिळावी म्हणुन भाषावार प्रांतरचना निर्माण करणे जरूरी आहे."[१०] ते पुढे म्हणतात "पृथक राष्ट्रीयत्वाचे सर्व गुणधर्म अशा प्रांतामध्ये असतील तर त्याची राष्ट्रीय वृत्ती पुर्णपणे विकसित करण्यासाठी त्यांना स्वातंत्र्य देण्यात यावे."[११]

अशा रीतीने भाषावार प्रांतरचना करताना राष्ट्रीयत्वाची वृद्धी करणे हा हेतु असल्याचे डॉ. आंबेडकर अधोरेखित करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढे म्हणतात, "भाषावार प्रांतरचना लांबणीवर टाकता येणार नाही. कारण भारताच्या पुर्व पंजाब, संयुक्त प्रांत, बिहार, पश्चिम बंगाल, आसाम आणि ओरिसा या सहा प्रांताची घटना भाषावार प्रांतरचनेच्या तत्वानुसार झालेली आहे. मुंबई, मद्रास आणि मध्यप्रांत या प्रांताची पुर्नघटना भाषावार प्रांतरचनेच्या तत्वावर करण्यात यावी अशी कळकळीची मागणी करण्यात आली आहे. भाषावार प्रांतरचनेचे तत्व सहा प्रांतावावत मान्य केल्यानंतर इतर प्रांताना त्या बाबतीत बेमुदत थांबण्यास सांगता येणे शक्य नाही. भाषावार प्रांतरचनेची मागणी एक स्फोटक शक्ती आहे. याच शक्तीने तुर्कस्तान आणि ऑस्ट्रिया हंगेरी या राज्याची धूळधाण उडवली आहे. स्फोटक होण्याचे टाळणे अवघड होऊन बसण्यापूर्वीच जनमताला मान्यता देणे रास्त होणार आहे. नवीन राज्यघटनेचे प्रांताना स्वायत्तता प्राप्त झाली आहे अशावेळी भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न अंत्यत निकडीचा झाला आहे."[१२] यावरून भाषावार प्रांतरचना मागे टाकता येणार नाही. जर तसे झाले तर त्यातुन भारतीय संघराज्य धोक्यात येईल. त्यामुळे भाषावार प्रांतरचना लवकरात लवकर करणे आवश्यक आहे, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते हे स्पष्ट होते. परंतु ते करताना कोणत्या कसोटया वापरल्या गेल्या पाहिजेत याविषयी डॉ. आंबेडकर मांडणी करतात.

भाषावार प्रांतनिर्मितीच्या कसोटया :

डॉ. आंबेडकराच्या मते भाषावार प्रांताची रचना करण्यापूर्वी प्रांतामध्ये तीन गोष्टीची पूर्ती झाली पाहिजेत.

अ) तो प्रांत स्वतच्या गुजराण करणारा, स्वंयपुर्ण असला पाहिजे. भाषावार प्रांतरचना करताना राज्याच्या आर्थिक गोष्टीचा विचार झाला पाहिजे. घटना निर्मितीच्यावेळी संस्थानाच्या विलीनीकरणाचा प्रश्न जेव्हा उद्भवला तेव्हा आर्थिकदृष्टया स्वावलंबीपणा अगत्याचा वाटला. कारण जी संस्थाने आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण होती, त्या प्रांतानाच स्वतंत्रतेचा दर्जा मिळाला. त्यामुळे आर्थिक स्वयंपूर्णता राज्य निर्मितीसाठी आवश्यक आहे.

व) भाषावार प्रांतरचना करताना होणा-या संभाव्य इष्टनिष्ट घटनांची पुर्व जाणीव असणे गरजेचे आहे, कारण भाषावार प्रांतरचना केली तरी प्रांतात वहुधा एकदोन जातीचे प्रभूत्व असते व वाकीच्या जाती अल्पसंख्याक असतात आणि वहुसंख्याक हे अल्पसंख्याकाना दडपून टाकतात. त्यामुळे भाषावार प्रांतरचनेमध्ये अल्पसंख्य जातीना काय आधार असेल. त्यांना कायदेमंडळात निवडुन येण्याची काही आशा आहे काय, त्यांना आर्थिक प्रगतीची अपेक्षा करता येईल का, प्रांतीक सरकारातुन नोक-या चाक-या मिळण्याची शक्यता आहे काय, याची जाणीव असणे आवश्यक आहेजर हे नसेल तर वहुसंख्याक जातींच्या हाती स्वराज्य देण्यासारखे आहे. त्यामुळे ज्याना या प्रश्नांची वाजु उमगली नाही त्यांना भाषावार प्रांतरचना असा शव्दप्रयोग समजणार नाही उलट अशा प्रांताना जाट प्रांत, रेडी प्रांत किंवा मराठा प्रांत असे म्हटल्यावरच वरोवर समजू शकेल.

क) एकच भाषा वोलणा-या लोकांचा एका प्रांतात समावेश केल्यावर त्याच्यात एकसंघपणा निर्माण होईल का या गोष्टीचा विचार करून भाषावार प्रांतरचना करावी.[१३]

अशा प्रकारे डॉ. आंवेडकरानी भाषावार प्रांतरचना करताना वरील तिन्ही मुद्दयांचा विचार करावा असे सुचविले. परंतु या त्यांच्या मतावर आक्षेप घेत श्री. मधु लिमये यांनी म्हटले की "वित्तीय स्वयंपूर्ण पाहिजे आणि बहुसंख्याचे अल्पसंख्याकांवर वर्चस्व निर्माण होईल ही आंवेडकरांची समजूत होती व आंवेडकराना अतिशोयक्ती करण्याची सवय होती"[१४] अशी टिका मधु लिमये यांनी केले आहे. त्याच्या या टिकेवर भाष्यकरणारे एक पुस्तीका बी सी कांवळे यानी लिहून त्यात ते असे स्पष्ट करतात की "मधु लिमये यानी त्या पुस्तकामध्ये डॉ. आंवेडकरांचे भाषावार प्रांतरचनेवद्दल पुर्ण विचार न करता काही गोष्टीचा उहापोह केले आहे"[१५] परंतु भारत सरकारने जो राज्य पुर्नरचना आयोग नेमला त्याने या कसोटयांचा विचार फारसा केला नाही याची खंत डॉ. आंवेडकरांना वाटली म्हणुनच त्यावर त्यांनी टिकाही केली.

16375

राज्यपुनर्रचना आयोगाच्या कार्यावरील टिका :

अ. असमतोल घटकराज्याची निर्मिती

भाषावार राज्यपुर्नरचनेच्या प्रश्नाचा समग्र अभ्यास करून त्या दृष्टीने केंद्र सरकारला शिफारशी करण्यासाठी राज्यपुनर्रचना आयोगाची नेमणुक करण्यात आली. राज्यपुर्नरचना आयोगाने सरकारला सादर केलेल्या अहवालात १६ घटकराज्ये व ३ केंद्रशासित प्रदेश निर्माण केले जावेत अशी शिफारस करण्यात आली. ही घटकराज्ये स्थापन करताना एका राज्याची लोकसंख्या १ ते २ कोटी, एक राज्य ४ कोटीहुन अधिक लोकसंख्येची, तर एक राज्य ६ कोटीहुन अधिक लोकसंख्येचे अशी शिफारस केली. या आयोगाच्या शिफारशींवर टिका करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात एका वाक्यात अनुमान काढावयाचा झाल्यास ही राज्यपुर्नरचना विलक्षण स्वरूपाची आहे. राज्याच्या विजोड आकाराने काही अनिष्ट परिणाम होतील याचे भान आयोगाला नव्हते असे म्हणावे लागेल. संघराज्यातील घटक राज्याचे आकार शक्यतो समसमान ठेवण्याची तुर्त आवश्यकता आयोगाला वाटत नाही असे दिसते. "राज्यपुर्नरचना आयोगाने केलेली ही पहिली आणि सर्वात भंयकर अशी घोडचुक होय ही चूक वेळीच सुधारली गेली नाही तर तिचा परिणाम वाईट होईल प्रसंगी भारताला त्याची जबर किंमत मोजावी लागेल."[१६] असा इशारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी दिला.

आयोगाने भाषावर राज्याची निर्मिती करताना दक्षिणी राज्ये कमी लोकसंख्येची व उत्तरेकडील राज्ये जास्त लोकसंख्येची निर्माण केली आहेत. याबद्दल डॉ. आंबेडकर म्हणतात "आयोगाला या विभाजनात काही अनर्थ ओढवेल असे वाटत नाही. परंतु ही गोष्ट आयोगाला वाटते तेवढी सोपी नाही हा नागिणीचा विषारी पुत्कार आहे, तिचे विष तत्क्षणीच ओळखुन घेतले पाहिजे."[१७] डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढे म्हणतात, राज्यपुर्नरचना आयोगाने एकच भाषा बोलणा-यांना एकाच राज्यात सामील करून ते उत्तरेकडील व दक्षिणेकडील राज्यें याच्यात मोठी तफावत निर्माण केली आहे. त्यामुळे भारतीय संघराज्य यशस्वी होण्यासाठी घटक राज्ये समतोल राहतील इतक्याच आकाराची असावीत त्यात विषमता ठेवल्यास ती संघराज्यास आणि भारताच्या ऐक्यासच घातक ठरतील. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अमेरिका व सोव्हिएत रशिया याचे उदाहरण देऊन एखादे राज्य कितीही लोकसंख्येने अगर भौगोलिकदृष्टया आकाराने मोठे असो पण तरी

सिनेटमध्ये सर्व राज्याना समान प्रतिनिधीत्वाची तरतुद घटनेत केलेली आहे. त्यामुळे लोकसंख्या अगर प्रादेशिकदृष्टया वडया आकाराच्या राज्याला छोटया राज्यावर वर्चस्व गाजवता येत नाही. भारतातील परिस्थिती अशी नाही. कारण उत्तर भारत आणि दक्षिण भारत यात लोकसभेतील प्रतिनिधीत्वात तीव्र विषमता आहे. वडया राज्याच्या राजकीय वजनाखाली छोटी राज्ये हतवल आहेत. तसेच लोकसभा आणि राज्यसभा यांच्या सत्तेत ही भारतात असमतोल आहे. "राज्याराज्यात लोकसंख्येच्या व अधिकाराच्या वावतीत निर्माण झालेली ही विषमता एक दिवस देशाला वाधेल. त्या करिता तातडीची उपाययोजना करणे अगत्याचे आहे."[१८] दक्षिण भारत व उत्तरभारत यांच्यामध्ये आयोगाने संतुलन राखले नाही ही आयोगाची दुसरी चूक डॉ. आंवेडकरांनी दाखवुन दिली आहे.

ब. उत्तर व दक्षिण यातील संघर्ष

डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी राष्ट्रभाषा हिंदी असावी असे सुचविले आणि ती आज ही राष्ट्रभाषा म्हणुनच ओळखले जाते. उत्तर भारत प्रामुख्याने हिंदी भाषिकांचे आहे, तर सगळया अहिंदी भाषा दक्षिणेत वोलल्या जातात. परंतु राज्यपुर्नरचना आयोगाने उत्तर भारताचे एकत्रीकरण केले व दक्षिण भारतात लहान लहान राज्ये निर्माण केली.

डॉ. आंवेडकर एका गोष्टीचा गौप्य स्फोट करतात ते लिहीतात "हिन्दी राष्ट्रभाषा म्हणुन स्विकृत करावी का याबद्दल सविस्तर चर्चा सुरू होती. घटनेत ११५ वे कलम राष्ट्रभाषेसंबधी आहे इतर कुठल्याही कलमापेक्षा या कलमावर विशेष वादग्रस्त व गरमागरम चर्चा झाली व या कलमावर जितका विरोध झाला, तितका विरोध कोणत्याही कलमावर झाला नाही. या कलमाइतकी गरमगरमी कोठेच दिसली नाही. उलटसुलट व प्रदीर्घ चर्चेनंतर हा प्रश्न निकालात काढण्यात आला आणि काय आश्चर्य! त्यात ७८ विरूध्द ७८ अशी मते पडलीत. या रस्सीखेचीची सांगता होऊ शकली नाही. काही कालावधी लोटला नंतर हाच प्रश्न कॉंग्रेस पक्षाच्या बैठकीत मतदानास टाकण्यात आला तेव्हा मतदान ७७ विरूध्द ७८ असे झाले केवळ एका मताने हिंदी ही राष्ट्रभाषा म्हणुन मिरवु लागली."[१९] यावरून दक्षिणेकडील राज्यांना हिंदी ही राष्ट्रभाषा मान्य नव्हती असे दिसुन येते.

क. उत्तर दक्षिण याची तुलना

डॉ. आंबेडकर म्हणतात "उत्तर ही प्रतिगामी आहे तर दक्षिण पुरोगामी आहे उत्तर पुराणमतवादी आहे तर दक्षिण बुध्दीप्रामाण्यवादी आहे. दक्षिण शैक्षणिकदृष्टया आघाडीवर आहे तर उत्तर पिछाडीवर, संस्कृती, दक्षिण भारताची अद्यावत आहे, तर उत्तर भारताची प्राचीनत्तम आहे"[२०] यावरून उत्तर व दक्षिण यांच्यात फार मोठी तफावत आहे असे दिसुन येते. उत्तर भारत व दक्षिण भारत याची तुलना करून डॉ. आंबेडकर प्रश्न विचारतात १५ ऑगस्ट १९४७ रोजी पंडित नेहरूनी पंतप्रधान झाल्यानंतर वाराणशीच्या ब्राम्हणांनी ब्राम्हण व्यक्ती पंतप्रधान झाल्याचा उत्सव साजरा करून गंगाजल प्राशन केले नाही काय किती महिला विधवांना या प्रदेशातुन सती म्हणुन जाळण्यात आले आहे. राष्ट्रपती राजेंद्रप्रसादनी बनारसला जाऊन त्यांनी ब्राम्हणाची पाद्यपुजा करून ते पाणी प्याले नाहीत काय? दक्षिण भारत अशा उत्तर भारताचे वर्चस्व सहन करील काय? दक्षिणेतुन उत्तरेपासुन अलग होण्याचे आवाज आजच निघत आहेत त्याचे काय? यावरून उत्तरभारत हे किती प्रतिगामी विचाराचे व पुरोगामी दक्षिण राज्य यांच्यात संघर्ष अटळ आहे. यांच्यातील संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उत्तरप्रदेशची तीन, मध्यप्रदेशची दोन व बिहारची दोन या राज्याचे विभाजन करण्यात यावे असे सुचविले. दुसरी गोष्ट भारताची दिल्ली ही राजधानी राष्ट्रीय संरक्षणाच्या दृष्टीने अस्थिर आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दुसरी राजधानी म्हणुन हैद्राबादला मान्यता दयावी, असे सुचवितात. त्यातुन दक्षिण व उत्तर राज्यामधील तणाव कमी होईल. असेही ते म्हणतात.

या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताचे पहिले गव्हर्नर जनरल राजगोपालचारी याचे उदाहरण दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "राजगोपालचारी याच्याशी झालेल्या अशाच एका भेटीत घटनासमितीने तयार केलेल्या घटनेच्या एका विशिष्ट भागाचा उल्लेख करून ते मला म्हणाले तुम्ही एक घोडचुक करीत आहात अखंड भारताकरिता सर्व घटक राज्यांना समान प्रतिनिधीत्व देऊन एक संघराज्य बनविण्याचा तुमचा विचार आहे पण ते संघराज्य सुरळीत चालु शकणार नाही अशा संघराज्याचा पंतप्रधान व अध्यक्ष हे नेहमी हिंदी भाषिक क्षेत्रातुनच नियुक्त केलेले असतील. म्हणुन दोन संघराज्ये उत्तर भारताचे एक व दक्षिण भारताचे दुसरे असावयास पाहिजे आणि दोन्ही संघराज्याचे एक संयुक्त संघराज्य बनविले

पाहिजे."[२१] यावरून राजगोपालचारी यांनी दक्षिण व उत्तर अशा फाळणीचे भविष्य वर्तविले आहे असे दिसुन येते या संदर्भात डॉ. आंबेडकर लिहितात "श्री राजाजीची ही भविष्यवाणी आपल्याला खोटी ठरविण्यासाठी हर प्रयत्न केले पाहिजे."[२२] अशाप्रकारे ही अनिष्ट गोष्ट घडु नये अशी काळजी घेणे गरजेचे आहे असे डॉ. आंबेडकराचे मत होते. अशारीतीने आयोगाच्या सदोष शिफारशी कशा आहेत हे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले आहे.

भाषावार प्रांतरचनेमुळे उदभवणाऱ्या अडचणी प्रश्न

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी भाषावार प्रांतरचनेमुळे ज्या अडचणी निर्माण होतील याचा ही विचार केला होता, तो पुढील प्रमाणे :

अ. केंद्र व राज्यातील प्रशासकीय संबंधामध्ये तणाव

डॉ. आंबेडकराच्या मते भारतातील राज्यपध्दती द्विदल आहे. केंद्र सरकार व प्रांतिक सरकार यामध्ये देशाचा राज्यकारभार विभागलेला आहे. राज्याचे संबंध केंद्रसरकारशी अविभाज्यपणे जोडलेले आहेत. तेव्हा भाषावार प्रांत निर्मितीस मान्यता देण्यापुर्वी नव्या राज्याच्या निर्मितीचा परिणाम केंद्र सरकारच्या कार्यावर घडुन येणार आहे, याचा विचार केला गेला पाहिजे. ते म्हणतात " समभावाचा कोणी मनुष्य अशी परिस्थिती मनात देखील आणणार नाही त्यामुळे हिंद देशाचे ऐक्य भंगुन जाईल. एवढेच नव्हे तर हिंद देश एकजुटीचा दिसण्याऐवजी त्याची दशा अराजक व अव्यवस्था याच्या प्रलयकाळात सापडलेल्या युरोपप्रमाणे होऊन त्यांचा अंत होईल."[२३] त्यामुळे केंद्र-राज्यात कारभार चांगल्यारीतीने होण्यासाठी प्रत्येक प्रातांची अधिकृत भाषा केंद्र सरकारचीच अधिकृत भाषा असेल अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी घेतले आहे.

ब. राज्य स्वंयपुर्णतेचा प्रश्न

डॉ. आंबेडकरांच्या मते राज्य स्वंयपूर्ण असले पाहिजे. राज्यांची निर्मिती भाषिक आधारावर झाल्यानंतर तेथील जनतेच्या गरजा पुर्ण करण्याकरिता त्यांना मिळणारा महसुल पुरेसा होईल काय? याचा विचार करावा. या संदर्भात डॉ. आंबेडकरांनी असे मत मांडले की, "स्वंयपूर्णतेचा प्रश्न, कारभार सहन करण्याची क्षमता व कर लादण्यासाठी लागणारी मनाची तयारी यावर निर्भर आहे, क्षमता भरपूर आहे, हवी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आहे मनाची तयारी."[२४] यावरून राज्य स्वयंपूर्ण करण्याची गरज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखली होती हे स्पष्ट होते.

क. बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात "सामाजिक व्यवस्थेवर राजकीय व्यवस्था अवलंबुन असते. ही समाजव्यवस्था राजकारणाला जीवदान देऊ शकते किंवा तिचा -हासही करू शकते. भारतात सामाजिक व्यवस्था जातीयतेवर आधारित आहे. हया जातीयवादाचे भाषावार राज्यरचनेवरही परिणाम होऊ शकतात.त्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे

- कोणताही एक विभाग घ्या, त्यात एकच जात संख्येने व आर्थिक दृष्टीनी वरचढ असते आणि इतर जातीना त्याचे वर्चस्व स्वीकारावे लागते.

- या जातीभेदाने विभागलेल्या समाजात श्रेणीय विषमता निर्माण झालेली आहे. सर्व जाती समपातळीत नाहीत. तर त्याची श्रेणी तयार झाली आहे. एक जात दुस-यापेक्षा उच्च आहे, खालच्या जाती उच्चजातींचा व्देष करतात तर वरच्या जाती खालच्या जातींचा तिरस्कार करतात.

- राष्ट्रातील स्वाभिमान व आपुलकीची भावना असते तशीच ती प्रत्येक जातीत प्रतिबिंबित झालेली आहे. म्हणुन विविध जातींचा समुह, म्हणजेच बहुसंख्याक व अल्पसंख्याक यांच्या व्देषातुन निर्माण झालेली विविध राष्ट्रे होत, असे म्हटले तर त्यात मुळीच अयोग्य होणार नाही."[२५] अशाप्रकारे समाजात जातीय विषमता असल्यामुळे बहुसंख्याक व अल्पसंख्याक असा जातीयवाद निर्माण होतो. या जातीयवादाचा परिणाम राजकारण व निवडणुकांवर कसा होतो याची मांडणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुढील प्रमाणे करतात:

अ) मतदान नेहमी जातीवादीने होते मतदाता नेहमी आपल्या जातीच्या उमेदवारालाच मत देतो. चांगल्या उमेदवाराला तो मत देत नाही.

ब) बहुसंख्य जाती किंवा जमातीचे लोक आपल्या उमेदवारालाच निवडुन आणु शकतात.

क) अल्पसंख्याक जमातीवर वहुसंख्याकाच्या उमेदवाराला मत देण्यास दडपण आणण्यात येते . .

ड) अल्पसंख्याक जमातीचा उमेदवार उभा करून वहुसंख्याकाच्या उमेदवाराच्या विरूध्द निवडुन आणणे वहुधा अशक्य आहे .

इ) जातीय वादाच्या श्रेणीवद्ध विषमतेमुळे वहुसंख्याक जातीतील मतदार अल्पसंख्यांक जातीच्या उमेदवाराला सहजासहजी मत देण्यास तयार नसतात . या उलट अल्पसंख्याक मतदार तो समाजाच्या खालच्या श्रेणीचा समजतो तो उच्चवर्णीय वहुसंख्याक उमेदवाराला मत देण्यात स्वत:ला धन्य समजतो . अल्पसंख्याकाचा उमेदवार त्यामुळे निवडणुकीत अपयशी ठरतो .[२६]

यावरून असे स्पष्ट होते की, वहुसंख्याक जातीतील उमेदवारच निवडणुकीत यशस्वी होतो आणि अल्पसंख्याकांच्या पदरी अपयश येते, असे आंवेडकराचे मत होते . राजकारणामध्ये वहुसंख्याकं जातीचा उमेदवारच निवडून येण्याची शक्यता अधिक असते . म्हणूनच डॉ . आंवेडकर लिहितात "भाषावार राज्य पुर्न रचनेमुळे, जातीय रचनेच वाईट परिणाम होऊन जातीयवाद उग्र स्वरूप धारण करेल, यात अल्पसंख्याक जमाती भरडल्या जातील . तसे नाही घडले तर निदान जुलुम आणि दडपशाही तरी फोफावेल . त्याच्यावर वहिष्कार घालण्यात येईल कायद्याला धारेवर धरून उच्चनिचतेचा हैदोस सुरू होईल आणि सार्वजनिक जीवनात सर्वाकरिता समान संधी प्राप्त होणार नाही ."[२७] यावरून वहुसंख्याक व अल्पसंख्याक यामध्ये संघर्ष निर्माण होऊन राष्ट्रीय एकतेला धोका निर्माण होईल असे डॉ . आंवेडकराचे मत होते हे स्पष्ट होते .

म्हणुन डॉ . बाबासाहेव आंवेडकरांनी अशी भूमिका घेतली की, अल्पसंख्यांकाच्या संरक्षणासाठी कोणतेही राज्य मोठे असता कामा नये . जितके राज्य मोठे तितके अल्पसंख्यांकाचे वहुसंख्याकांसाठी प्रमाण अल्प असते . त्यासाठी छोठी राज्ये तयार करावी व अल्पसंख्यांकाना निवडणुकीत निवडुन येण्याची संधी मिळावी . या हेतुने बहुसदस्य मतदार संघ व एकाच उमेदवाराने एकाहुन अधिक मते देण्याची परवानगी असावी . या तत्वावर मतदार संघाची पुर्नरचना करण्यात यावी असा तोडगा त्यांनी सुचविला . आज भारतात अनेक राज्यांमध्ये बहुसंख्यांकांचे वर्चस्व असलेले दिसुन येते .

डॉ. आंबेडकरांची भाषावार प्रांतरचनेच्या विरोधाची तत्वे

डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी भाषावार प्रांतरचनेविषयी वेळोवेळी आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. स्वांतत्र्यपुर्ण कालखंडात डॉ. आंवेडकरांनी भाषावार प्रांतरचना केली तर भाषिक आधारावर प्रादेशिक जाणीवाना प्रोत्साहन मिळते आणि त्या राज्यात येणारे शासन हे एकाच जातीतुन निर्माण होते ही भिती व्यक्त केली. भाषावार प्रांतरचनेवर आक्षेप घेताना त्यांनी तीन आक्षेप घेतले

१. या प्रांतरचेन्त लोकसंख्या विभाग आणि शेतसारा याचा अजिवात विचार केला नसुन त्यात भाषेलाच फक्त निर्णायक घटकाचे स्थान दिलेले आहे.

२. भारतीय संविधान हे आधीच लवचिक असल्यामुळे या प्रकारची भाषावार प्रांतरचना संविधानाला अधिक लवचिक करणारी शक्ती वनु शकेल, याकडे दुर्लक्ष झाले,

३. प्रादेशिक राष्ट्रवादाला उत्तेजन देऊन जनतेत कॉग्रेसला रूजविणे या उद्देशाने ही प्रांतरचना आखली होती. [२८] अशा प्रकारे डॉ. आंबेडकरानी भाषावार प्रांतरचनेविषयी विरोधी भूमिका घेतली.

परंतु भाषिक आधारावर राज्य हा विचार १९२० पासून कॉग्रेसश्रेष्ठीनीच केला होता आणि व्रिटीश राजवटीतच अनेक प्रांत हे भाषिक आधारावरच निर्माण झाले होते. त्यामुळे भाषावार प्रांतरचना अस्तित्वात येणे अटळ होते. तरीही डॉ. आंवेडकरानी भाषावार प्रांतरचनेच्या विरोधात आपली मते मांडली. या मुद्दयाचे विवेचन प्रा. अशोक चौसाळकरानी केले आहे. ते म्हणतात, डॉ. वावासाहेव आंवेडकर भाषावार प्रांतरचनेविषयी भूमिका मांडताना असे म्हणतात की, "भाषिक राज्ये राष्ट्रीय एकात्मतेस धोका निर्माण करतील त्याच्यामुळे फुटीरतावादी वृत्ती बळावेल. भाषावर प्रांतरचनेनंतर प्रत्येक प्रांतात लोकसंख्या जमीनीची मालकी व दंडुकेशाही यांच्या आधारावर वरचढ जाती संघटित होतील व त्या सत्ता आपल्या हातात घेतील. वरचढ जाती इतर जातींच्यावर अन्याय करतील, बळाचा वापर करून त्यांना नमवण्याचा प्रयत्न करतील. भाषावर प्रांतात ज्या मागास जाती व मागास भाग सामील होणार आहेत त्याच्या हिताच्या रक्षणासाठी खास तरतुदी करण्यात याव्यात. मागास भागातील लोकाचे त्यामुळे नुकसान होणार नाही याची

काळजी घ्यावी"[२९]. भारतीय एकात्मतेला धोका निर्माण होऊ नये बहुसंख्याक किंवा वरचढ जातींचे वर्चस्व निर्माण होऊ नये आणि अल्पसंख्याकाच संरक्षण मिळावे असा विचार डॉ. आंबेडकरानी केलेला दिसुन येतो. अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी भाषावार प्रांतरचनेस विरोधातील भूमिका स्पष्ट केले आहेत. भाषावार प्रांतरचनेचा विचार केल्यानंतर शेवटी डॉ. आंबेडकरांनी असे म्हणतात "मी केवळ सरळ मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केला आहे आता भारतीयानी यावर गंभीरपणे विचार करावा."[30] असे म्हटले आहे.

प्रस्तुत प्रकरणात हे स्पष्ट होते की डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी भाषावार प्रांतरचनेचा विचारास सुरूवातीला विरोध दर्शविला. परंतु नंतर आपली भुमिका बदलुन वेळोवेळी भारतीय संघराज्याच्या एकात्मतेचा विचार करून अनेक सुचना केल्या. त्याचबरोबर भाषावार प्रांतरचनेमुळे येणा-या अडचणी, त्याचा समाजावर होणारा परिणाम या सर्व गोष्टींची चिकित्सक चर्चाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी केलेली दिसते.

संदर्भ सुची

१ . Ambedkar B.R., Writings and speeches, Vol.No.I, Govt.of Maharastra, 1989, P.143

२ दहिवले स्मरण (अनु .) भाषावार राज्य मिमांसा, सुगत प्रकाशन, नागपूर, १९७८, पृ . १४

३ किल्ला, पृ . १५

४ किल्ला, पृ . १५

५ . जाधव वि . तु . (अनु .) भाषिक राज्यपुनर्रचना मीमांसा, बुध्दभूषण प्रिटींग प्रेस, मुंबई, १९५५, पृ . १८

६ . Kuber W.N., Dr. Ambedkar–Acritical study, People's publishing House, New Delhi, 1979, P-230

७ . दहिवले स्मरण (अनु .)भाषावार राज्य मिमांसा, सुगत प्रकाशन, नागपूर, १९७८, पृ . १७

८ . किल्ला, पृ . १७

९ . Ambedkar B.R.,Writings and speeches, Vol.No.I, Govt.of Maharastra, 1989, P.145

१० कांवळे वी . सी . (अनु .) मराठी भाषिकांचा महाराष्ट्र, भारत भूषण प्रिटींग प्रेस, मुंबई, १९४८, पृ . १

११ किल्ला, पृ . १

१२ . Ambedkar B.R., Writings and speeches, Vol.No.I, Govt.of Maharashtra, 1989, P.104

१३ . Ambedkar B.R., Writings and speeches, Vol. No. XX , Govt. of Maharashtra, 2005, P. 434 to 436

१४ . मधु लिमये, डॉ . आंबेडकर :एक चिंतन, रचना प्रकाशन, मुंबई, १९८६, पृ . ८६

१५ . कांबळे बी . सी . ,भाषिक राज्ये राष्ट्र बांधणीस विघातक ठरतील काय, राष्ट्रतेज मुद्रणालय, अलिबाग, १९८६, पृ . ८

१६ . दहिवले स्मरण (अनु .),भाषावार राज्य मिमांसा, सुगत प्रकाशन, नागपूर, १९७८, पृ . ११

१७ . कित्ता, पृ . १२

१८ . कित्ता, पृ . २०

१९ . Ambedkar B.R. Writings and speeches Vol.No.I, Govt.of Maharastra, 1989, P.148

२० . दहिवले स्मरण (अनु .), भाषावार राज्य मिमांसा, सुगत प्रकाशन, नागपूर, १९७८, पृ . २२

२१ . कित्ता, पृ . २४ व २५

२२ . शेटये मधु, दै . लोकसत्ता, ६ऑगस्ट २००८

२३ . कांबळे बी . सी . (अनु .), मराठी भाषिकांचा महाराष्ट्र, भारत भूषण प्रिंटींग प्रेस, मुंबई, १९४८, पृ . ३

२४ . दहिवले स्मरण (अनु .), भाषावार राज्य मिमांसा, सुगत प्रकाशन, नागपूर, १९७८, पृ . ५१

२५ . कित्ता, पृ . ५३

२६ . Ambedkar B.R., Writings and speeches, Vol.No.I, Govt.of Maharastra, 1989, P.167

२७ . कित्ता, १६८

२८ . कसवे रावसाहेब, हिंदु मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदु राष्ट्रवाद, सुगावा प्रकाशन, पुणे,पृ . ४८

२९ . चौसाळकर अशोक, प्रवोधन प्रकाश ज्योती, मे २०१०

३० . विभुते भालवा, प्रवोधन प्रकाश ज्योती, डिसेंवर २०१०